बीड, लातूर, परभणी, नांदेड, जालना, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सातारा, मुंबई, नाशिक येथून एकाचवेळी

दैनिक साप्ताहिक

# अक्षर वार्ता

DAILY SAPTAHIK AKSHAR VARTA

आपल्या सर्वांचे लोकप्रिय वृत्तपत्र

संपादक- संजय रघुनाथ हांगे मो.९७६६२६८४१५

कार्य.संपादक- सुमन संजय हांगे मो.८७८८२५१११४

बीड (महाराष्ट्र) वर्ष ६ वे, अंक ४६, गुरूवार ०८ ऑक्टोबर २०२६ RNI Reg.NO./2021/83381 Postel Regd No.L SB/Beed/RNP-257/2025-2027 E-mail : aksharwartanews@gmail.com पृष्ठे : ४ किंमत २ रुपये.

BEED (MAHARASHTRA) Year 6, Issue 46, THURSDAY 08 OCTOBER 2026 RNI Reg.NO./2021/83381 Postel Regd No.L SB/Beed/RNP-257/2025-2027 E-mail :akasharwartanews@gmail.com Pages 4 Prise Rs.2 Rupees.

डीटीपी ऑपरेटर पाहिजे

डीटीपी ऑपरेटर कॉम्प्युटरवर काम करणारा गरजूवंत पाहिजे

संपर्क:–

8788251114

9766268415

## दुष्काळग्रस्त महाराष्ट्राला केंद्र सरकार मदत करणार - मुख्यमंत्री



नवी दिल्ली । वृत्तसंस्था महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नवी दिल्लीत भेट घेऊन राज्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत जास्तीत जास्त मदत देण्याची मागणी केली. या भेटीत राज्यातील दुष्काळाची तीव्रता, पिण्याचे पाणी, चारा आणि पिकांचे नुकसान याबाबत सविस्तर माहिती फडणवीस यांनी शाह यांच्यासमोर मांडली.फडणवीस यांनी भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, केंद्रीय गृहमंत्री हे एनडीआरएफशी संबंधित प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात तसेच आंतरमंत्रालयीन गटाचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडेमदतीचा प्रस्ताव पाठविला असून, या प्रस्तावाची प्रत अमित शाह यांना देण्यात आली आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दुष्काळ निर्माण झाला असून, आगामी काळात पिण्याच्या पाण्याची तसेच चाऱ्याची समस्या गंभीर होण्याची शक्यता आहे. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची तीव्रता जाणवत असून, मोठ्या प्रमाणावर तालुके दुष्काळाने प्रभावित झाले आहेत, अशी माहिती फडणवीस यांनी शाह यांना दिली. राज्याची परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी केंद्राचे पथक तातडीने महाराष्ट्रात पाठवावे, अशी विनंतीही त्यांनी केली. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशीही यापूर्वी चर्चा झाली असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यानुसार केंद्र सरकारचे पथक ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातील विविध दुष्काळग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. पथकाकडून पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि दुष्काळाची एकूण परिस्थिती यांचा आढावा घेतला जाणार असून त्यानंतर केंद्राला अहवाल सादर केला जाणार आहे. या अहवालासोबत महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा विचार करून एनडीआरएफच्या माध्यमातून मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे केंद्राच्या पथकाचा दौरा आणि त्यानंतरचा अहवाल महाराष्ट्राच्या दुष्काळी मदतीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

### फडणवीसांची अमित शाह यांच्याशी भेट

**केंद्र सरकारचे पथक ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातील विविध दुष्काळग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार**



महाराष्ट्रातील दुष्काळाची व्याप्ती लक्षात घेता केंद्र सरकारने राज्याला विशेष मदत करावी, अशी मागणी आपण अमित शाह यांच्याकडे केली असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

यावर अमित शाह यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, नियमांमध्ये बसणारी जास्तीत जास्त मदत महाराष्ट्राला करण्याचे आश्वासन दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून पंचनामे आणि इतर मदत प्रक्रियेला वेग देण्यात येत आहे.

## एमपीएससी आंदोलन हायजॅक; ते राजकीय बनले - मुख्यमंत्री

### विद्यार्थी शिष्टमंडळांनी मांडलेल्या सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या होत्या

दिल्ली । वृत्तसंस्था पुण्यातील एमपीएससी परीक्षार्थींचे आंदोलन हायजॅक झाले असून, त्याचे रूपांतर राजकीय आंदोलनात झाले आहे, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केला. तसेच, विद्यार्थी शिष्टमंडळांनी मांडलेल्या सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या होत्या, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.दिल्लीत पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, विद्यार्थ्यांच्या १५ सदस्यांच्या शिष्टमंडळाने यापूर्वी राज्य सरकारकडे पाच मागण्या सादर केल्या होत्या आणि त्या सर्व मान्य करण्यात आल्या होत्या. या विद्यार्थ्यांचे आंदोलन हायजॅक झाले आहे. आता ते पूर्णपणे राजकीय नेत्यांचे आंदोलन बनले आहे.



एमपीएससीशी संबंधित मुद्यांऐवजी आता विविध राजकीय मुद्यांवर भाषणे केली जात आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा अधिकार सरकारकडे नाही, कारण या घटनात्मक प्रक्रियेततेसर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रपती यांचा सहभाग असतो, हे सरकारने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले होते. आम्ही त्यांना सांगितले की, अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींकडे आहे आणि तोही सर्वोच्च न्यायालयाने चौकशी करून आपले निष्कर्ष राष्ट्रपतींकडे सादर केल्यानंतरच वापरला जाऊ शकतो. तरीही, सरकारने न्यायालयीन चौकशी करण्यास सहमती दर्शवली. चौकशीत गैरवर्तन आढळल्यास कलम ३१७ अन्वये अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची शिफारस करण्यासही सरकार तयार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, सरकारने एमपीएससीच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्याच्या मागण्या मान्य केल्या आहेत आणि विद्यार्थी, प्राध्यापक व एमपीएससीचे माजी परीक्षार्थी यांच्याशी चर्चा करून सुधारणांची शिफारस करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. यापूर्वीच्या परीक्षांच्या बाबतीत प्रश्नपत्रिका फुटल्याचा कोणताही पुरावा समोर आलेला नसतानाही त्या परीक्षांची चौकशी करण्यास परवानगी देण्यात आली होती. जर असा अडथळा निर्माण करणे सुरूच राहिले, तर मला असे वाटते की, विद्यार्थ्यांच्या हिताऐवजी राजकीय हितसंबंध जपले जात आहेत. हे आंदोलन पूर्णपणे राजकीय झालेआहे, असे फडणवीस म्हणाले. राजकीय घटक विद्यार्थ्यांच्या मुद्याचा वापर करून स्वत:चे हित साधण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप फडणवीस यांनी केला.

## आ.सुरेश धस यांचे प्रयत्नाने..

### आष्टी ग्रामीण रुग्णालयात तीव्र हार्ट अटॅक वरील उपचार पद्धतीचा शुभारंभ

**५३ हजार रु. किमतीचे इंजेक्शन होणार मोफत उपलब्ध**



आष्टी ( प्रतिनिधी ) आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये तीव्र हार्ट अटॅक आल्यानंतर द्यावयाचे इंजेक्शन उपलब्ध झाले असून आणि उपचाराचे संयंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे अशा पद्धतीचे उपचार करणारे ग्रामीण रुग्णालय बीड जिल्ह्यात एकमेव रुग्णालय ठरले आहे काल दि.०७ ऑक्टोबर रोजी ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली त्यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, माजी सभापती आदिनाथ सानप, रुग्णकल्याण समिती सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे उपस्थित होतेयावेळी अधिक माहिती देताना ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे म्हणाले की, एखाद्या व्यक्तीला तीव्र हार्ट अटॅक आल्यास या उपचार पद्धतीने रक्ताच्या गुठळ्या पातळ करण्यात येतात तीव्र हार्ट अटॅक असल्यामुळे सुरुवातीच्या एक तासात अशा पद्धतीचा उपचार दिल्यास पेशंट जगू शकतो या उपचार पद्धतीमध्ये एक इंजेक्शन उपलब्ध करून देण्यात आले असून त्याची बाजारी किंमत ५३ हजार रुपये आहे परंतु ते ग्रामीण रुग्णालयामध्ये

♦♦पान २ वर

## ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत घाटकोपरमध्ये विकसित भारत संकल्प सभा ; सेवा ज्योती यात्रेचाही केला शुभारंभ

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्णत्वाकडे

मुंबई दि. ०७ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारताचा पाया रचला, त्यांच्यामुळेच विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्णत्वाकडे जात असल्याचे सांगत मोदींचा चेहरा आज भाजपाचा ब्रॅन्ड बनला आहे असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जनसेवा ते राष्ट्रसेवा या यशस्वी राजकीय कारकिर्दीला पंचेवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मुंबई उपनगरातील घाटकोपर (पूर्व) येथे झवेरबेन पोपटलाल सभागृहात भाजपच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत







आयोजित विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेच्या शुभारंभ कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार त्यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत यावेळी व्हर्च्युअल माध्यमातून ऐकले. संपूर्ण देशभरात एकाचवेळी हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्हर्च्युअल संबोधन होण्यापूर्वी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने विकसित भारत संकल्प सभेची सुरवात झाली.भाजपचे प्रदेश कोषाध्यक्ष आ. मिहीर कोटेचा, जिल्हाध्यक्ष दिपक दळवी, लालबहादूर यादव, संयोजक हेमंत भास्कर, नगरसेविका राखी जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष योगेश मकवाना, महिला मोर्चा

♦♦पान २ वर

## सहा वर्षांपासून फरार शस्त्र कायदा प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

बीड (प्रतिनिधी):-गुन्हा दाखल झाल्यापासून पोलिसांना चकवा देणाऱ्या कुंदनसिंग जुन्नीला शिताफीने अटकबीड, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड येथे दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक २८९/२०२० कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा या गुन्ह्यात गुन्हा दाखल झाल्यापासून मागील सुमारे सहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस शिवाजीनगर पोलिसांनी शिताफीने पकडून अटक केली आहे. सदर आरोपीचे नाव कुंदनसिंग जागुसिंग जुन्नी, रा. महासांगवी रोड, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड असे आहे. सदर आरोपी हा गुन्हा दाखल झाल्यापासून पोलिसांना गुंगारा देत फरार होता. आरोपीचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाकडून सातत्याने प्रयत्न सुरू होते. प्राप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्यास

♦♦पान २ वर



## दुष्काळ आढावा बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांनी केल्या महत्वाच्या सूचना

### पशुधनाला वेळेत चारा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करावे

***शासकीय क्षेत्रांसह धरणांच्या गाळपेर क्षेत्रावर चारा पिकांची लागवड करण्याचे निर्देश देण्याचा मांडला मुद्दा**

मुंबई, दि. ६ - दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा उपलब्धतेचे वेळेत नियोजन करावे. त्यासाठी हायड्रोपोनिक्स, अझोला व सायलेज यांसारख्या पर्यायी चारा पद्धतींचा वापर करावा, यासह काही महत्वाच्या सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुष्काळविषयक आढावा बैठकीत केल्या.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठा आणि पीक-पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ



उपसमितीच्या बैठकीत शेतकरी व शेतमजुरांना केंद्रस्थानी ठेवून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत समितीच्या सदस्य मंत्री पंकजाताई मुंडे, दत्तात्रय भरणे, मकरंद पाटील, नितेश राणे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, गिरीष महाजन, बाबासाहेब पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनेक महत्वाचे मुद्दे मांडले. वन विभागाच्या जमिनी, शासकीय प्रक्षेत्रे, विविध विभागांच्या अखत्यारीतील शासकीय क्षेत्रे तसेच विविध धरणांच्या बॅकवॉटरमधील गाळपेर क्षेत्रावर चारा पिकांची लागवड करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात, असेही मंत्री मुंडे यांनी यावेळी मागणी केली.*चारा आणि दुष्काळासाठी सीएसआरची मदत घेणार*राज्यात दुष्काळ निवारणासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. पाणी असलेल्या ठिकाणी चारा बँक करण्यात

♦♦पान २ वर

## बीड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांचे विशेष प्रयत्न

### अतिरिक्त वीज भार मंजूर करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर वेग

बीड दि.७ (प्रतिनिधी) :- बीड शहरासमोरील संभाव्य भीषण पाणीटंचाई लक्षात घेता, नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सततच्या पाठपुराव्यामुळे प्रशासकीय स्तरावर वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. आ.क्षीरसागर यांच्या या यशस्वी पाठपुराव्याला आता मोठे यश आले असून, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींचा आधार घेत महावितरण कंपनीला पत्र लिहिले आहे. बीडमधील भीषण पाणीटंचाईवर मात करण्यासाठी काडीवडगाव येथे १५०० आणि ईट येथे १३०० चा एकूण आवश्यक अतिरिक्त वीज भार विशेष बाब म्हणून तातडीने मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी महावितरणकडे



पत्रव्यवहार केला आहे.बीड शहराची अंदाजे २,६५,००० लोकसंख्या असून शहराला दररोज ३६ दशलक्ष लीटर पाण्याची आवश्यकता भासते. आतापर्यंत यापैकी ८ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करणाऱ्या बिंदुसरा धरणातील पाणीसाठा अपुऱ्या पावसामुळे ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत संपुष्टात आल्याने, शहराची संपूर्ण भिस्त आता माजलगाव धरणावर अवलंबून आहे. माजलगाव धरणावरून पाणी उचलणाऱ्या काडीवडगाव येथील अशुद्ध पाणी उपसा केंद्र आणि पिंपळगाव मंजरा (ईट) येथील जलशुद्धीकरण केंद्राचा वीज भार वाढवणे अत्यंत आवश्यक होते. मात्र, बीड नगर परिषदेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने व महावितरणची कोट्यवधी रुपयांची वीज बिल थकबाकी असल्यामुळे हा अतिरिक्त वीज भार मंजूर करण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या. या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी वरिष्ठ पातळीवर सातत्याने बैठका घेऊन हा विषय लावून धरला. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आणि मागणीनुसार, जुलै २०२६ मध्ये उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली तसेच नगर विकास विभागाच्या मुख्य सचिवांसोबत विशेष बैठका पार पडल्या. या बैठकीत मदत व पुनर्वसन विभागाकडून विशेष बाब म्हणून



निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. याचा आधार घेत तसेच दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड नगरपरिषदेमार्फत थकीत वीज बील भरण्याच्या अधीन राहून व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदीस अनुसरुन दोन्ही ठिकाणी अतिरिक्त विद्युत भार विशेष बाब म्हणून तातडीने मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी वेळेवर दाखवलेली तत्परता आणि केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे बीडकरांवरील पाण्याचे मोठे संकट टळण्यास मदत होणार असून, नागरिकांमधून या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

## संपादकीय.....

# दुष्काळाच्या खाईत.!

जूनमध्ये पाऊस विलंबाने चालू झाला. त्यामुळे पेरण्या लांबल्या. जुलै महिन्यात थोडा पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी कर्ज काढून दुबार पेरण्या केल्या; परंतु ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यांत पुन्हा पाऊस आलाच नाही.त्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे आता पाण्याने भरले आहेत. विहीर असणारे शेतकरीही दुष्काळ अनुभवत आहेत. पंजाबमध्ये ४० टक्के, गोव्यात ३२, कर्नाटकात ३०, गुजरातमध्ये १३ टक्के पावसाची तूट आहे, तर केरळ आणि बिहार या राज्यांमध्येही दुष्काळाचे सावट आहे. महाराष्ट्रात २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्यावर त्यांतून काही ठिकाणे वगळली गेल्याचे लक्षात आले. त्यांनाही दुष्काळग्रस्त भागांत घेण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. हवामान विभागाच्या आकडेवारीने महाराष्ट्रात पावसाची १९ टक्के तूट दाखवली. सर्वाधिक सोलापुरात ५८ टक्के, बीडमध्ये ५१, मराठवाड्यात ४० आणि विदर्भात २३ टक्के पावसाची तूट आहे; परंतु तरीही त्यांच्या प्रत्येकाच्या दृष्टीने तो १०० टक्के दुष्काळच झाला आहे. सोयाबीन, कापूस, तूर ही खरिपाची पिके पार सुकून गेली आणि भूमीत पाणीच नसल्याने रब्बीच्या हंगामाकडूनही शेतकऱ्यांना काही आशा नाही. त्यामुळे वर्षभराचे आर्थिक गणित उद्ध्वस्त झाले आहे. गायराने सुकली आहेत, अद्याप चारा छावण्यांचा पत्ता नाही आणि शेतकऱ्यांनी गोधन विकायला काढले आहे. शेतकऱ्यांना गोधन विकावे लागणे, यासारखी अत्यंत दुःखद आणि गंभीर गोष्ट कुठलीही नाही. परभणीत १ क्विंटल मिरचीला केवळ २५० रुपये मिळत आहेत.

त्यात शेतकऱ्याची मजुरीही निघणार नाही.आता शेतातील हानीचे पंचनामे चालू झाले आहेत. केंद्राचे पथक महाराष्ट्रात येण्याची शक्यता आहे. तेही परत पंचनामे करील. महसूल माफी, कर्ज पुनर्गठन, वीज देयकात सवलत, चारा छावण्या, टँकर, चांगला हमीभाव, असे १२ प्रकारचे साहाय्य शासनाने घोषित केले आहे; परंतु प्रत्यक्षात कार्यवाही अजून चालू झालेली नाही. शेतकऱ्याला दिवाळीच्या पूर्वी साहाय्य हवे आहे. गेल्या वर्षीचा विमा काही शेतकऱ्यांना अद्याप मिळाला नसल्याने या वर्षीच्या साहाय्याविषयी शेतकऱ्यांना विश्वास न वाटणे साहजिक आहे. विरोधक म्हणतात की, प्रत्यक्षात साहाय्याच्या धारिका हालत नाहीत.

केवळ शासकीय निर्णय होतात. हे खोटे आहे, हे दाखवण्याचे दायित्व आता शासनाचे रहाते.वातावरणीय पालटांमुळे यंदा दुष्काळ पडणार, असे गेले काही महिने सांगण्यात येत होते. शासनाकडून पिकांची पेरणी विलंबाने करा, असे आवाहन सतत करण्यात येत होते; परंतु एवढे पुरेसे आहे का? जलसंपदा विभागाने नेमक्या त्याच वेळी काही उपाययोजना तत्परतेने करायला घ्यायला हव्या होत्या. मे आणि जून महिन्यांमध्ये पाण्याचे काटकसरीने नियोजन करणे शक्य झाले असते का ?, हे पहायला हवे.

ऊस आणि बागायती यांसाठी धरणांतून अधिक पाणी सोडले गेले का?, हेही पहायला हवे. समजा हाच दुष्काळाचा अंदाज चीन किंवा जपान या देशांमध्ये काही महिन्यांपूर्वी आला असता, तर तेथील शासन आणि नागरिक यांनी एक होऊन कंबर कसली असती. सरकारने पाणीपुरवठ्याचे ठोस नियोजन करण्यासाठी दिवस-रात्र एक करायला हवी होती. पावसाचे पाणी साठवण्याच्या उपाययोजना या वर्षी अनेक ठिकाणी करू शकलो असतो; पण तशा त्या झाल्या नाहीत. अन्य राज्यांच्या संदर्भाने दुष्काळी स्थितीवर काय उपाय काढले?, याची चर्चा करायला हवी होती. दीर्घकालीन आणि तात्पुरत्या उपाययोजनांमध्ये त्यांनी अपेक्षित अशी गती का घेतली नाही ? आतापर्यंतच्या उपाययोजनांची प्रामाणिक फलनिष्पत्ती पहाणेही आवश्यक आहे.

कर्जमाफी हा अंतिम पर्याय नाही, हे तर सर्वश्रूत आहेच. उपाययोजनांचा आढावा सरकारने घेतला, तर निदान यापुढे तरी त्यात सुधारणा करता येईल. वर्ष २०२५-२६ मध्ये वैयक्तिक शेततळ्यांसाठी १०० कोटी रुपयांच्या कार्यक्रमाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली; मात्र योजना किती टक्के यशस्वी झाली ? असा एक अधिकृत राज्यव्यापी टक्केवारीचा आकडा शासनाने दिलेला दिसत नाही. हा दुष्काळावर पूर्ण पर्याय नसला, तरी त्याने हानी अल्प होऊ शकते. कोट्यवधी रुपयांचे अनुदान शेततळ्यांना आहे; पण ही लक्षावधी शेततळी खरोखर चालू स्थितीत आहेत का? याची आकडेवारी आज शासनाकडे उपलब्ध नाही. जुलै २०२६ मधील राज्यस्तरीय कृषी कार्यक्रमात शासनाने अनेक भागांत एका पिकाऐवजी २-३ पिके घेतल्याचे आणि फळबागा वाढल्याचे सांगितले; परंतु हा जलयुक्त शिवार, अन्य जलसंधारणाची कामे आणि शेततळी याचा एकत्रित परिणाम होता; मग या सर्वांवर अधिक भर द्यायला हवा होता का? कोकणाची सरासरी उंची अनुमाने ६० मीटर, तर सह्याद्रीची सरासरी उंची ६०० मीटरहून अधिक असल्याने पश्चिमेकडून पूर्वेकडे पाणी नेण्यासाठी मोठी अभियांत्रिकी व्यवस्था आवश्यक आहे. याखेरीज स्थानिकांचा विरोधही या प्रकल्पाला होत आहे. कोकणातील पाणी मराठवाड्याकडे वळवण्याचा मोठा प्रकल्प अजून प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याच्या टप्प्यात आलेला नाही. यातील १४ लहान नदीवळण योजना पूर्ण झाल्या असल्या, तरी अजून प्रचंड मोठा पल्ला गाठणे शेष आहे. त्याला ७ किंवा त्याहून अधिक वर्षे लागतील.

राज्यात ठिबक सिंचन पद्धत व्यापक प्रमाणात का वापरली जात नाही ? हेही पहायला हवे. केवळ कापूस, सोयाबीन आणि ऊस ही पिके न घेता अल्प पाणी लागणाऱ्या पिकांचा पर्याय शेतकऱ्यांना दिला गेला का ? किंवा शेतकरी तो कार्यवाहीत का आणत नाहीत ? ज्वारी, बाजरी, नाचणी ही अल्प पाण्याची पिके हद्दपार का केली आहेत ? याचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. विदर्भात ४५ टक्के आणि अन्य ठिकाणी ७५ टक्के धरणे भरल्याचे सांगितले गेले आहे. त्याचा दुष्काळासाठी कसा उपयोग करणार ? याचाही अभ्यास होणे आवश्यक आहे.काही जणांना मोठा नळ चालू ठेवून सर्व कामे करण्याची सवय असते. आधुनिक पद्धतीच्या नळाच्या यंत्रणेत काही नळ हे काही सेकंदांसाठी चालूच रहातात.

त्यात पाणी वाया जाते. शौचालयांमधील टाक्यांची व्यवस्था यांसारख्या पद्धती सरसकट अस्तित्वात आहेत, त्या सर्वत्र आवश्यक आहेत का ?, याविषयी जनजागृती करायला हवी. मुख्यमंत्र्यांनी जनतेला सण साधेपणाने करण्याचे आवाहन केले.

शेतकऱ्याला तर ते भागच पडणार आहे; पण शासक आणि प्रशासक त्यांच्यावर होणाऱ्या अवाढव्य खर्चात कपात करण्यास ते सिद्ध का नाहीत ? निवृत्त शासकांना निवृत्तीवेतन चालू असते. या वर्षीचे त्यांचे निवृत्तीवेतन दुष्काळी खर्चासाठी द्यायचे, असे मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान का घोषित करत नाहीत? त्याग केवळ जनतेने करावा का? फुलांच्या गुच्छाऐवजी एक फूल देणे, एक दिवस दुचाकीने येणे यांसारख्या गोष्टींना आरंभ करून सरकारने पैसे वाचवण्यास आरंभ केला आहे. त्याचा पुढचा टप्पा गाठण्याची या दुष्काळात त्यांना संधी आहे. ती त्यांनी घ्यावी, असे जनतेला वाटते !

---

# || पोटदुखी: एक समस्या ||

पोटदुखी ही एक आपल्यापैकी बऱ्याच जणांना अधून-मधून जाणवणारी एक समस्या आहे. पोटदुखी ही एक साधारण समस्या जी की आहारात काही कमी जास्त झाल्यामुळे, अपचनामुळे पोटात कळ मुरडा येणे, पित्ताचा त्रास होणे अशी किरकोळ असू शकते. त्याच वेळी ती एखाद्या दुर्धर क्षयरोग किंवा कर्करोगाचे एक लक्षण देखील असू शकते. त्यामुळे पोटदुखी वर घरगुती इलाज न करता, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार सल्ला घ्यावा व निश्चिंत रहावे.

पोटदुखी साठी तात्काळ वैद्यकीय सल्ला व त्यानुसार पुढील काही तपासणी करून घेणे याचे एक प्रमुख व अतिशय महत्वाचे कारण हे असे की, अनेकदा आपल्यास काही विशेष त्रास नसतानाही आपण पोटाची सोनोग्राफी करतो किंवा रक्त, लघवीच्या काही तपासण्या करतो

तेंव्हा एखादा खूप मोठा कॅन्सरचा किंवा क्षयरोगाचा प्रादुर्भाव पोटात झालेला आढळतो. याचाच अर्थ असा कि, आपल्या

वयानुसार व तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य व आवश्यक त्या तपासण्या करून घेणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे आपणास त्यात काही आढळल्यास पुढील यथायोग्य उपचार व काळजी घेता येईल. आता आपण बघूयात पोटदुखीची

कारणे; साधारणपणे पोटाचे एकूण ९ कप्पे करण्यात आलेले असून त्या प्रत्येक कप्प्यानुसार पोटदुखीची कारणे आपण वर्गीकृत करूयात.

कप्पा क्रं.१: लिव्हर (मराठीमध्ये यकृत) व पित्ताशयाचे आजार, मोठ्या आतड्यांचे आजार, पॅनक्रिया (मराठीमध्ये स्वादुपिंड)आजार.

कप्पा नं.२: पोटाचे,आम्लपिताचे चे आजार, पॅनक्रिया-म्हणजेच स्वादुपिंडाचे आजार कप्पा नं.३: स्प्लीन (प्लीहा)चे आजार, डाव्या बाजूचे मोठ्या आतडीचे आजार कप्पा नं. ४: उजव्या किडनीचे आजार,

उजव्या मूत्रमालिकेतील खड्याचे आजार, पॅनक्रियास चे आजार, उजव्या बाजूच्या मोठ्या आतडीचे आजार कप्पा नं. ५: पॅनक्रियास, जठर, पित्ताचे आजार, अपचन व चयापचयाचे आजार कप्पा नं.६: डाव्या बाजूचे किडनी व मूत्रनलिकेचे आजार, मूत्रखड्याच्या तीव्र वेदनादायक समस्या, डाव्या आतड्यांचे आजार , अपचन व बध्दकोष्टता,




कप्पा नं.(७): अपेंडीक्स चे आजार उजव्या मूत्रनलिकेतील खड्यामुळे तीव्र स्वरुपाच्या तीव्र वेदना, व उजव्या आतडीचे आजार.

कप्पा नं.(८): पोटातील, बद्धकोष्ठता मूत्राशयातील खड्याचे आजार, लघवीची जळजळ व तीव्र वेदना कप्पा नं. (९): डाव्या मूत्रनलिकेतील मुतखड्याचे तीव्र वेदना व आजार डाव्या बाजूच्या मोठ्या आतडीतील -अपचनाचे आजार.

**पोटदुखीची लक्षणे:**

अर्थातच पोटदुखीचे प्रमुख लक्षण हे पोटदुखीच आहे परंतु त्याचे प्रकार: खालील प्रमाणे, Epigastric pain: छातीच्या खालच्या भागात, बरोबर मध्यभागी तीव्र जळजळ होणे, तोंडातून कडू - आंबट पाणी सुटणे,हा त्रास आम्लपित्ताच्या असु शकतो

यासाठी पोटाची सोनोग्राफी करणे,रक्त तपासण्या करणे, तसेच गरज भासल्यास तोंडातून दुर्बीण टाकून(Gastroscopy) करणे इत्यादी आवश्यक तपासण्या व त्यानुसार पुढील उपचार लागू शकतात,

२) पाठीकडून पोटातील खालच्या भागात दुखणे सरकणे व तीव्र वेदना:अशा प्रकारच्या वेदना या मुत्राशयातील अडकलेल्या खड्यांमुळे (Obstructed“ureteric stones) होऊ शकतात, यामध्य तीव्र वेदनेसोबतच व्यक्तीला लघवीला जळजळ होणे, प्रसंगी उलटी देखील होते, असे प्रकार जाणवतात. याच्या तपासणीमध्ये सोनोग्राफी

अथवा पोटाचा सी. टी. स्कॅन करणे, व दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करून मुतखडा काढून घेणे: हा विलाज होय, याचप्रमाणे किडनीमधील खडा व,मुताशयातील खडे देखील अशाच प्रकारच्या लक्षणांसह प्रकट होऊ शकतो, आतडीचे / अपचनाचे त्रास: यामध्ये पोट गच्च-गच्च वाटणे, करपट ढेकर येणे, तोंडामध्ये आंबट पाण्याची गुळणी येणे, शौचास व्यवस्थित व रेग्युलर न होणे, असे त्रास संभवतात.

यासाठी पोटाची सोनोग्राफी व आवश्यकता असल्यास सी. टी. स्कॅन करणे, रुग्णाची योग्यप्रकारे history taking ? clinical examination करणे व त्यानुसार उपचार घेणे, अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीच्या पोटाच्या आजारामध्ये येणारा खालील प्रकार: = स्वादुपिंडाचा कर्करोग(Pancreatic Cancer) जठराचा कर्करोग( Stomach Cancer ) पोटाचा व आतडीचा क्षयरोग( Abdominal and intestinal“Tuberculosis / Koch's ) आतडीचा कर्करोग( Bowel malignancies ) गुदद्वार व रेक्टमचा कर्करोग ( Rectal & Anal canal“Cancers ) किडनी व मूत्रमार्ग/ मूत्राशयाचा कर्करोग( Renal & Urothelial Cancer ) यकृताचा कर्करोग( Liver Cancer ) या व अशा अनेक दुर्धर आजारांवर आपल्याला योग्य वेळी, व योग्य त्या तपासणीद्वारे अचूक परीक्षण करून पारंगत डॉक्टरांकडून उपचार करून घेणे अत्यावश्यक ठरते, अशा योग्य तपासण्या व योग्य त्या उपचारांमुळे आपल्या या उद्या दुर्धर आजारांवर आपण निश्चितच मात करू शकतो, व आपले जीवन अधिक स्वास्थ्यपूर्ण व आनंदी बनवू शकतो. आपणा सर्वांना सुदृढ आरोग्याच्या मनभर शुभेच्छा.

**डॉ. अनिल भा.सानप**
गॅस्ट्रो एण्ड लेप्रोस्कोपी सर्जन / लेसर सर्जन
जीवनज्योत हॉस्पिटल
---------------
शिवाजी नगर,बीड मो नं: ८७६७२३५९२३ लाईफलाईन मल्टीस्पेशालिटी सर्जिकल हॉस्पिटल, महालक्ष्मी टॉवर,नगर नाका,बीड मो नं: ८०८०६७४६३३



---

पान ३ वरून...

## चिंचवन येथे रात्रीच्या अंधारात मौल्यवान सरकारी जमीन हडपणाऱ्या भू-माफियावर गुन्हा दाखल करा!

जेव्हा स्थानिक महसूल अधिकारी (तलाठी / मंडळ अधिकारी) आणि ग्रामपंचायत प्रशासनाने या बेकायदेशीर अतिक्रमणावर आक्षेप घेतला, तेव्हा या भू-माफियाने शासकीय कर्मचाऱ्यांनाच दाब-दडपशाही व अरेरावी करण्यास सुरुवात केली. आपल्या बेकायदेशीर कृत्याला कायदेशीर ढाल मिळवण्यासाठी या व्यक्तीने प्रामाणिक शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध विविध वरिष्ठ कार्यालयांमध्ये खोट्या आणि बनावट तक्रारी दाखल करण्याचा सपाटा लावला आहे, जेणेकरून प्रशासनावर मानसिक दबाव निर्माण करून सरकारी जमीन कायमस्वरूपी हडपता येईल. जिल्हा प्रशासनाला ४ कलमी मागण्यांचे अल्टिमेटम; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा!या महाघोटाळ्याप्रकरणी इंजि. सादिक इनामदार यांनी मा. जिल्हाधिकारी (बीड), मा. अप्पर जिल्हाधिकारी (अंबाजीगाई) आणि मा. उपजिल्हाधिकारी (माजलगाव) यांना पुरावे व सातबाऱ्यासह अधिकृत तक्रार अर्ज सादर केला असून खालील कडक मागण्या केल्या आहेत:१. तात्काळ फौजदारी गुन्हा (): शासकीय जमिनीची फसवणूक करणे आणि बेकायदेशीर ताबा मिळवल्याबद्दल आरोपी अंगद बडे याच्यावर भारतीय न्याय संहिता (), २०२३ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यांतर्गत तात्काळ गुन्हा नोंदवून अटक करावी.२. अतिक्रमण निष्कासित करणे: चिंचवन येथील गट क्र. ५२१ मधील त्रिमूर्ती मशनरी व हार्डवेअर हे बेकायदेशीर दुकान पोलीस बंदोबस्तात तात्काळ जमीनदोस्त () करून जमीन शासनाच्या ताब्यात घ्यावी.३. कर्मचाऱ्यांना संरक्षण: भू-माफियाच्या खोट्या तक्रारींना बळी न पडता स्थानिक कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण द्यावे.४. उच्चस्तरीय चौकशी: या संपूर्ण गैरव्यवहारामध्ये महसूल बुडवणाऱ्या आणि मूक संमती देणाऱ्या इतर घटकांची सखोल चौकशी व्हावी.प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी व कडक कारवाई न केल्यास, भ्रष्टाचार निर्मूलन समिती आणि पीडित नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र अमरण उपोषण व आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा इंजिनिअर सादिक इनामदार यांनी दिला आहे.

---

## शिवसेना दलित आघाडीच्या आष्टी तालुकाप्रमुखपदी अनिकेत मोरे यांची

त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या शिकवणीचा आदर्श समोर ठेवून शिवसेना पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. पक्षाने माझ्यावर सोपविलेली जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडेन,फ्फ असा विश्वास नवनियुक्त तालुकाप्रमुख अनिकेत मोरे यांनी व्यक्त केला.या नियुक्तीबद्दल शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच सांगवी परिसरातील नागरिकांकडून अनिकेत मोरे यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

---

# कवितेमुळे पुनर्जन्म लाभला म्हणूनच मी कवितेला आईच संबोधतो : कवी प्रा.वा. ना.आंधळे

## शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनातील कवी संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

त्र्यंबकेश्वर : माझ्या आईच्या पोटी मी जन्मलो अन जगाचे दर्शन झाले.ऐन तारुण्यात माझा कवितेच्या पोटी जन्म झाला अन जग मला ओळखू लागले.आईने बोट धरून चालणं शिकवलं तर कवितेने बोट धरून बोलणं शिकवलं.आई आशीर्वाद देतांना म्हणायची औक्षवंत हो! कविता आशीर्वाद देतांना म्हणायची मी तुला चिरंजीव करीन.मित्रहो,कवितेनं भरभरून ओळख दिली.शालेय अभ्यासक्रमापासून पदव्युत्तर अभ्यासक्रमात कवितेनेच मला मिरविले.आपल्या सारख्या श्रोत्यांपासून सातासमुद्रापार असलेल्या वाचकांपर्यंत पोहचवले.मातृप्रेम यापेक्षा आणखी काय वेगळे असते.म्हणून मी तिला आईच संबोधतो. शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर जिल्हा जळगाव आयोजित दि. ३ व ४ऑक्टोबर२०२६ या दोन दिवशीय चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनात त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज साहित्य नगरी व आदिशक्ती संत मुक्ताई व्यासपीठ संत निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिर शेजारी भव्य सभागृहात ते कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.संभाजीनगर येथील उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. सुभाष बागल यांचे अध्यक्षतेखाली संमेलन नुकतेच भव्य आणि दिव्य



स्वरूपात संपन्न झाले. याया संमेलनातील भव्य ग्रंथ दिंडी सर्वांचेच आकर्षण ठरले यामध्ये संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांना आदिशक्ती संत मुक्ताई कडून भव्य आणि दिव्य हार सर्वांच्या उपस्थितीत अर्पण करण्यात आला हे या संमेलनाचे विशेष आकर्षण ठरले. एरंडोल जिल्हा जळगाव येथील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन सुद्धा भन्नाट गाजले या प्रसंगी व्यासपीठावर फाऊंडेशनचे कोल्हापूर येथील डॉ.मारुती गुरव अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक श्री तुळशीराम बोबडे श्री वासुदेव खोपडे अमरावती येथील प्रा.डॉ.मंदा नांदुरकर श्री संजय ठोसर फाऊंडेशनचे बार्शी जिल्हा सोलापूर येथील कवी अशोक मोहिते, प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके, आळंदी येथील सौ.रूपाली चिंचोलकर सांगली येथील सौ.मेघा पाटील बेळगाव कर्नाटक येथील प्रा.विनायक पाटील पुण्यातील श्री जगन्नाथ बुडूखले गुरुजी खामगाव येथील श्री पांडुरंग दैवज्ञ श्री शंकरराव अनासुने श्री बाळु भाऊ इटणारे साखरखेर्डा येथील कवी रामदास कोरडे आदी मान्यवर प्रमुख म्हणून उपस्थिती व्यासपीठावर उपस्थित होते याप्रसंगी नाशिक येथील डॉ. रमाकांत जाधव डॉ. श्यामकुमार दुसाने जळगाव येथील श्री मधुकर पोतदार भुसावळ येथील ज्ञानेश्वर घुले,नांद्रा येथील कवी स्वप्नील पाटील, एरंडोल येथील श्री निंबा बडगुजर धाराशिव येथील डॉ. मधुकर हुजरे शिरपूर येथील श्री अरविंद भामरे धुळे येथील प्रा.अश्विन अमृतकर, धुळे येथील श्रीमती रंजना पवार बदलापूर येथील श्री रमेश उज्जैनकर बुलढाणा येथील श्री डी.आर. बांगर कोल्हापूर येथील श्री प्रवीण सूर्यवंशी प्रा.डॉ.सविता व्हटकर, प्रा.आरती लाटणे, श्री साताप्पा सुतार लातूर येथील श्री गुरु हराळे बेळगाव कर्नाटक येथील श्री शांताराम भादवणकर पुणे येथील श्री जगन्नाथ बुडूखले सौ.धनश्री म्हेत्रस, आदी कवी व कवयित्रींनी या कवी संमेलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील तसेच गोवा, कर्नाटक, गुजरात राज्यातील कवींनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन फाउंडेशनच्या धुळे जिल्हा उपाध्यक्षा सौ.प्रीती नंदलाल मोरे व फाउंडेशनच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षा सौ. सारिका जोशी यांनी केले त्याप्रसंगी शेवटी या कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांनी सुद्धा आपली कविता सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. प्रा.आंधळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,कविता जन्माला आली अन जगण्याला मोल आले.दृष्टी आणि सृष्टी सुंदर झाली.कविता ही भेदाच्या पलीकडे नांदत असल्यामुळे व वयाच्याही मर्यादा तिला आड येत नसल्यामुळे जगाचे मातृपद कवितेकडे जाते.या विधानाची सार्थकता माऊलीच्या पायासदनाचे उदाहरण देत त्यांनी श्रोत्यांपुढे कवितेची थोरवी कथन केली.याबरोबरच संमेलनाच्या एकूणच आयोजन नियोजनावर भाष्य करतांना ते म्हणाले ,हे चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन गेल्या दोन दिवसापासून विविध उपक्रमांनी व विविध जिल्ह्यातून,राज्यातून आलेल्या साहित्यिक, रसिकांची दाद मिळवून गेले. या संमेलनाच्या यशाचे श्रेय उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा या संमेलनाचे मुख्य आयोजक डॉ.शिवचरण उज्जैनकर यांना व त्यांच्या सर्व कुटुंबीयांना तसेच नातेवाईकांना आणि फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना जाते.या भावशब्दात एकूणच साहित्य संमेलनाविषयी कृतज्ञता कवी संमेलनाध्यक्ष प्रा.वा. ना.आंधळे यांनी उपस्थितांसमोर नोंदवली.

---

पान १ वरून...

## आ.सुरेश धस यांचे प्रयत्नाने..

मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे तीव्र हार्ट अटॅकचा रुग्ण दाखल झाल्यानंतर त्याची तपासणी करून थ्रोंबोलायसिस पद्धतीने उपचार करून डीफॅब्रिलेटर,सिरीज पंप इत्यादी व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली असून यासाठी स्वतंत्र कक्ष आणि स्वतंत्र बेड उपलब्ध करून देण्यात आले आहे या पद्धतीने उपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी आणि स्टाफ नर्सेस या सर्वांना प्रशिक्षण देण्यात आले आहे त्यामुळे हार्ट अटॅक सदृश्य लक्षणे दिसून येत असलेल्या रुग्णांनी आणि त्याच्या नातेवाईकांनी तात्काळ ग्रामीण रुग्णालयाकडे संपर्क करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे

---

## ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत घाटकोपरमध्ये विकसित भारत संकल्प सभा ; सेवा ज्योती यात्रेचाही केला शुभारंभ

अध्यक्षा दीपिका घाग, प्रभाग समिती अध्यक्ष साक्षी दळवी, आश्विनी मते आदी यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीला आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत, गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी सुरवात केली आणि एकदा नाही तर तीन वेळेस ते पंतप्रधानपदावर विराजमान झाले, त्यांना खरचं दैवी आशीर्वाद असावा असे वाटते. आयुष्यचा क्षण न क्षण त्यांनी जनसेवा आणि राष्ट्रसेवेसाठी खर्च केला.त्यांच्यामुळे देशाचा नावलौकिक जगात झाला, यांनी आत्मनिर्भर भारताचा पाया रचला, विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने त्यांच्यामुळेच पूर्णत्वास येत आहे. भारत आज जागतिक महासत्तेकडे वाटचाल करत आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. पक्षाचे संघटन आणि मिळालेले संस्कार भविष्यात आपल्या सर्वांना अधिक उंचीवर घेऊन जातील असं त्या म्हणाल्या.

*सेवा ज्योती यात्रेचा केला शुभारंभ*यानिमित्त काढण्यात आलेल्या सेवा ज्योती यात्रेचा शुभारंभ ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आल्या. आ. मिहीर कोटेचा, दिपक दळवी यांचे सह त्या स्वतः ज्योत घेऊन यात्रेत सहभागी झाल्या. आत्मनिर्भर भारताची भली मोठी रांगोळी यावेळी रेखाटण्यात आली, त्याचेही कौतुक त्यांनी केले. कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, लोक प्रतिनिधी याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## सहा वर्षांपासून फरार शस्त्र कायदा प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

शिताफीने ताब्यात घेतले. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड, पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, पोलीस हवालदार रवींद्र आघाव व पोलीस हवालदार शिवदास घोलप यांनी केली.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब तसेच मा. पोलीस उपअधीक्षक श्री. नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

---

## दुष्काळ आढावा बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांनी केल्या महत्वाच्या सूचना

येणार आहे. यासाठी राज्यातील विविध कंपन्याची सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून मदत घेतली जाणार आहे. सर्व तालुक्याला समान न्याय देण्यासाठी जास्तीत जास्त कंपन्यांनी सीएसआरसाठी मदत करण्याचे आवाहन मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले.

---

पान ४ वरून...

## अॅड. किशोर खेडकर यांच्यामुळे सायबर फ्रॉड गुन्ह्यातील फिर्यादीस तेरा लाख रु. मिळाले

व न्यायालयीन प्रक्रियेत अॅड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून सर्व फिर्यादीस तेरा लाख रुपये देण्याचे आदेश दिले.या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. या कामी अॅड.सतीश चव्हाण याचे सहकार्य लाभले अॅड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.

---

## रिपाइंची दुष्काळग्रस्तांना १०० ट्रक धान्याची मदत

वाटपकागदे, काकासाहेब खंबाळकर, बाबुराव कदम, गौतम सोनवणे, कोषाध्यक्ष एम. एस. नंदा उपस्थित होते. रिपाइं पक्ष केवळ बौद्धवाड्यापुरता मर्यादित ठेवायचा नाही. रिपाइं सर्व जाती-धर्मांचा पक्ष बनवायचा आहे. पक्षाची वाटचाल २८ राज्यांमध्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये होत असून नागालँड आणि मणीपूर या राज्यांमध्ये ऊस उत्पादक शेतकरी हे निवडणूक चिन्ह पक्षाला मिळाले आहे. रिपब्लिकन पक्ष संघर्ष करणारा आहे.सामाजिक न्यायाची लढाई लढणारा पक्ष आहे. आपण सत्तेत नक्कीच आहोत, पण अन्याय झाला तर कोपऱ्यात शांत बसू नका. अन्यायाविरुद्ध रस्त्यावर उतरा, असे आवाहन मंत्री आठवले यांनी केले. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतक-यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

महाडच्या चवदार तळे क्रांतीच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेला यंदाचा समता क्रांती मार्च दुष्काळामुळे आपण रद्द केला आहे. दुष्काळामुळेहोरपळणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांना मदत केली पाहिजे. त्यासाठी रिपब्लिकन पक्ष गरीब असला तरी शंभर ट्रक जीवनावश्यक वस्तूंची मदत दुष्काळग्रस्तांना पाठवणार आहे, असे मंत्री आठवले यांनी जाहीर केले. दुष्काळामुळे शेतकऱ्याचे पीक गेले जळून, तरी सरकार मदतीपासून नाही जाणार पळून अशी चारोळी मंत्री आठवले यांनी केली. रिपब्लिकन पक्षाची ताकत कार्यकर्ते आहेत.

ती ताकद कार्यकर्त्यांनी दाखवली पाहिजे.प्रत्येक वेळी मित्र पक्षाच्या मागे लागायचे नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपली ताकत दाखवा. आपले लोक निवडून आणा. त्यासाठी पक्ष बांधणी करा.सर्व समाज घटकांना सोबत घेऊन पक्ष मजबूत करा, असे आवाहन मंत्री आठवले यांनी वर्धापन दिनाच्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये केले.

---

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण

रक्षण करण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचा संदेश या स्पर्धेतून देण्यात आला.बक्षीस वितरण कार्यक्रमास नगराध्यक्ष सौ. गीता भाभी बाळराजे पवार, उपनगराध्यक्ष सौ. रेवतीताई भगवानराव घुंबाडे, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, स्वच्छता व पर्यावरण सभापती तथा नगरसेवक प्रशांत राख, रत्नमालाताई मोटे, शैलाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच नगरपरिषदेचे सहायक प्रकल्प अधिकारी राघव वावळे, दिनेश आवटे, शहर समन्वयक सुरेखा चव्हाण, प्रकाश रानमारे, दीपक साळवे यांच्यासह गेवराई नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी, शिक्षकवृंद तसेच नागरिकांनीही कार्यक्रमास उपस्थिती लावली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

# आष्टी तालुक्यात ९,४६ ३ शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा

## केवायसी अभावी ३,७८ शेतकरी अद्याप लाभापासून वंचित; केवायसी पूर्ण करण्याचे सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांचे आवाहन



९,४६३ शेतकऱ्यांना मिळाला लाभआष्टी तालुक्यात कर्जमाफीसाठी पात्र ठरलेल्या १२ हजार ६४१ शेतकऱ्यांपैकी ९ हजार ४६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांपैकी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना शासनाच्या कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे.

उर्वरित शेतकऱ्यांनीही आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यास त्यांना योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही केवायसी पूर्ण न झाल्याने लाभ मिळालेला नसलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित बँक अथवा आवश्यक ठिकाणी संपर्क साधून आपली केवायसी तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शासनाच्या अधिकृत प्रक्रियेनुसार आवश्यक कागदपत्रे व केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफीची रक्कम खात्यावर जमा झाल्याने हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, आता केवायसी प्रलंबित असलेल्या ३ हजार १७८ शेतकऱ्यांनीही प्रक्रिया पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आष्टी । प्रतिनिधीराज्य शासनाने नुकतीच जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेचा आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे. तालुक्यातील एकूण १२ हजार ६४१ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले असून, त्यापैकी ९ हजार ४६३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. मात्र, अद्याप ३ हजार १७८ शेतकऱ्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याने हे शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

आष्टी येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात कर्जमाफी योजनेबाबत माहिती देताना सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांनी सांगितले की, राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया करण्यात आली आहे. त्यापैकी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झाली आहे.मात्र, काही शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळे त्यांच्या कर्जमाफीची रक्कम वर्ग होऊ शकलेली नाही.तालुक्यातील ३ हजार १७८ शेतकरी या कारणामुळे लाभापासून अद्याप दूर आहेत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी विलंब न करता आपली केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन पूजा सांगळे यांनी केले आहे.

# बीड शहराचा पाणीपुरवठा प्रश्न, आता दिसतो का ?

## गेली ३५ ते ४० वर्ष तुम्ही सत्तेत काय केल ? बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितिन जायभाये यांचा खडा सवाल..

### *बीड शहरामध्ये प्रचंड भीषण पाणी टंचाई चे संकट, दुष्काळ सदृश्य परिस्थिती

### * प्रशासन आणि पालिकेचे शासन याबाबतीत प्रचंड उदासीन..

बीड प्रतिनिधी : बीड शहरांमध्ये निर्माण झालेल्या प्रचंड भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर काही नेते नगरपालिकेच्या प्रशासना सोबत बैठका करत आहेत. परंतु या सर्वांना बीड शहर बचाव मंचाच्या अध्यक्ष या नात्याने मी प्रश्न विचारत आहे की तुम्ही गेली ३५-४० वर्ष सत्तेत राहून काय केल ?; अटल अमृत जल योजनेच काय केल ? अटल अमृत जल योजना अपूर्ण का राहिली ? अयशस्वी का झाली ? आज अकस्मात गंभीर होत या बैठका करणाऱ्या नेत्यांच्या हातात एक हाती सत्ता असताना सुद्धा यांना बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचे प्रश्न यापूर्वी दिसले नव्हते का ? आज बीड शहरावर ही वेळ का आली ? आता इथून पुढं वर्षभर कोरड्या दुष्काळ काळामध्ये नागरिकांनी काय करायच, कसं जगायचं ? पुढच्या वर्षी पाऊस पडेपर्यंत बीड शहराची तहान कशी भागणार ? अतिशय प्रचंड भीषण पाणी टंचाईचे संकट यावर्षी बीड शहरावर येत




आहे.नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये नक्की काय चाललं आहे. प्रचंड बोगसगिरी आणि भ्रष्टाचार तिथं माजलेला आहे. कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार तिथ होत आहे. बीड शहरामध्ये अनाधिकृत नळ कनेक्शनची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. हजारो नळ कनेक्शन (हा आकडा खूप प्रचंड मोठा आहे) हे बोगस आहेत. जे नळ कनेक्शन्स नोंदणीकृत नसून अनाधिकृत आहेत याची खरी आकडेवारी नगरपालिकेने तात्काळ जाहीर करावी. नगरपालिकेमध्ये चांगल्या अधिकाऱ्यांना टिकू दिले जात नाही, काम करू दिले जात नाही. लोकांच्या मागण्या, अर्ज, निवेदने याला सरळ कचऱ्याची टोपली दाखवण्यात येते. काही वार्डांमध्ये गुंडगिरी पद्धतीचा अवलंब केला जातो असा काही अधिकाऱ्यांचा सुद्धा अनुभव राहिलेला आहे. नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागा च्या अंतर्गत काही वार्डांमध्ये कुणीही उठतो आणि गुत्तेदार होतो आणि स्वतःच्या मनानेच अवैध कनेक्शन लोकांना देतो . ज्याची कुठेही नोंद नसते. या सर्व गोष्टींना आळा बसणे गरजेचे आहे. काही काळापूर्वी शासनाने पाणीपुरवठा विभागाला प्रचंड मोठ्या स्वरूपामध्ये निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्या निधीमार्फत आता काय कामे चालू आहेत ? या निधीच काय करण्यात आल ? शहरांमध्ये व शहराच्या भोवती कुठेही काहीही काम करण्यात येत आहे असे काहीही दिसत नाही किंवा काही योग्य रचनात्मक कल्पक पद्धतीने पाणीपुरवठा विभागातून काही नवीन योजना केल्या जात आहेत असेही कुठेही दिसून येत नाही. बीड शहरातील अनेकानेक भागांना एक महिन्यापासून पिण्याचे पाणीच मिळालेले नाही. नगरपालिका प्रशासन आणि शासन बीड शहराच्या पाणी पुरवठ्या विषयी इतके का उदासीन आहे कळायला मार्ग नाही. प्रचंड गलथान कारभार या पाणीपुरवठा विभागांमध्ये चालतो हा आमचा गेल्या काही वर्षापासून चा अनुभव आहे. निवडणुका झाल्यावर केलेल्या डोंगरभर घोषणा धुळीला मिळाल्या. पुन्हा जैसे थे तीच परिस्थिती. कारभारात सुधारणा काही होत नाही. शहरातील नागरिकही अशाच नेत्या पुढाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडतात ही मोठी खंत आहे, शोकांतिका आहे. सद्य परिस्थितीमध्ये आणि पुढच्या काळामध्ये बीड शहरामध्ये प्रचंड व भीषण पाणी टंचाई उद्भवणार आहे याचे संकेत आतापासूनच मिळू लागलेले आहेत. यासाठी तात्काळ पाण्याचे नियोजन व पाणीपुरवठ्या संबंधी इतर उपाययोजना राबवण्यात येण्याची अत्यंत गरज आहे. त्यासाठी रचनात्मक व कल्पकतेने योग्य आराखडे तयार करून सर्व लोकप्रतिनिधींनी योग्य त्या इच्छाशक्ती द्वारे काम करून येणाऱ्या काळामध्ये भीषण पाणी टंचाई आणि दुष्काळा बरोबर लढणे गरजेचे झालेले आहे. आजही योग्य पद्धतीने नियोजन करण्यात आले तर बीड शहराला आठ दिवसांमध्ये दोनदा पाणीपुरवठा करण्यात येऊ शकतो. परंतु नगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग व नगरपालिकेचे प्रशासन आणि शासन या बाबतीत प्रचंड उदासीन असल्याचे या निमित्ताने दिसून येते.

# शिवसेना दलित आघाडीच्या आष्टी तालुकाप्रमुखपदी अनिकेत मोरे यांची निवड

आष्टी। प्रतिनिधीशिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत पक्षसंघटना अधिक बळकट करण्यासाठी सक्रिय असलेले सांगवी येथील अनिकेत संतोष मोरे यांची शिवसेना दलित आघाडीच्या आष्टी तालुकाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर, शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख सचिन मेघडंबर, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल चौरे, तालुका सचिव अनिकेत जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही नियुक्ती करण्यात आली. यावेळी नागेश डाडर, दीपक भाऊ मोरे, अमोल मोकाशे, महेश सकट, दीपक डाडर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते



उपस्थित होते.शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, खासदार श्रीकांतजी शिंदे, शिवसेना सचिव संजयजी मोरे, मराठवाडा संपर्कप्रमुख प्रकाशजी आबीटकर, बीड जिल्हा संपर्कमंत्री भरतशेठ गोगावले, मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन तसेच बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.अनिकेत मोरे हे शिवसेनेच्या विचारांशी एकनिष्ठ राहून संघटनात्मक कार्यात सक्रिय आहेत. आगामी काळात आष्टी तालुक्यात शिवसेना दलित आघाडीची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे तसेच पक्षाची भूमिका तळागाळापर्यंत पोहोचविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी ♦♦पान २ वर

# नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या जनसेवेचा गौरव; बीडमध्ये सेवा संकल्प सभाफउत्साहात संपन्न

**पंकजाताई मुंडे व डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन; भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती**

बीड । प्रतिनिधी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या प्रवासानिमित्त भारतीय जनता पार्टी, बीड जिल्ह्याच्या वतीने नवगण महाविद्यालय, बीड येथे ङ्कसेवा संकल्प सभाफ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. पंकजाताई मुंडे आणि डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सभेला भाजपचे प्रमुख पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांच्या प्रशासकीय प्रवासाला सुरुवात झाली. त्यानंतर २०१४ मध्ये देशाच्या पंतप्रधानपदाची जबाबदारी



स्वीकारत त्यांनी राष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गुजरातच्या विकासापासून ते देशाच्या नेतृत्वापर्यंतच्या त्यांच्या प्रवासाचा गौरव करत सेवा, सुशासन आणि राष्ट्रनिर्माणाचा संकल्प या सभेत व्यक्त करण्यात आला.गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात वीज, पाणी, शेती, पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकास या क्षेत्रांवर भर देण्यात आला. पंतप्रधान म्हणूनही गरीब, वंचित, महिला, शेतकरी आणि युवकांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देत आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या संकल्पनेला पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या जनसेवेच्या प्रवासातून प्रेरणा घेत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. नितीनजी काळे उपस्थित होते. तसेच भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. शंकरराव देशमुख, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते श्री. माधवतात्या निर्मळ, श्री. बाळराजे पवार, बीड नगरपालिकेच्या गटनेत्या सौ. सारिकाताई शिरसागर, भाजप युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. संजयभाऊ आंधळे, पद्मश्री शिबीरभाई, पी. टी. चव्हाण, रामदासजी बडे, रुपालीताई कचरे, विनायक रत्नपारखी आणि जिल्हा उपाध्यक्ष रणजित भैय्या रूपनर यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सेवा, सुशासन आणि राष्ट्रनिर्माणाचा संकल्पनरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवासानिमित्त आयोजित या सेवा संकल्प सभेत विकसित भारताच्या ध्येयासाठी एकजुटीने कार्य करण्याचा संदेश देण्यात आला. राष्ट्रहित, जनसेवा आणि विकासाच्या विचारांना बळ देत समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प यावेळी अधोरेखित करण्यात आला.भारत माता की जय!वंदे मातरम!

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये गॅस सुरक्षा अभियान संपन्न

किल्ले धारूर - ७ ऑक्टोंबर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये गॅस सुरक्षा अभियान अंतर्गत एचएलसी फाउंडेशनचे श्री. राहुल कांबळे, श्री. रवी गायकवाड यांनी गॅस वापरताना घ्यावयाची काळजी व अचानक काही प्रसंग निर्माण झाल्यास कोणती उपाययोजना करावी याविषयी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून माहिती दिली.

तसेच गॅसला सुरक्षित मीटर बसविल्यास आवश्यक तेवढ्याच दाबाने शेगडीला गॅस पुरवठा होतो



यामुळे धोका टळतो असे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. धनराज सोळंके, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. निलेश शिंदे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल कल्याण कुलकर्णी यांचा पोलीस अधीक्षक रितू खोकरे मॅडम यांच्या हस्ते वाशी, धाराशिव येथे सन्मान.



# जिल्ह्यात रेशीम उद्योगाला मिळणार मोठी चालना; ग्लोबल विकास ट्रस्टसोबत समन्वय करारासाठी प्रशासकीय हालचाली वेगवान

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक संपन्न; पोखरा २.० अंतर्गत तुती लागवड आणि शेड उभारणीला मिळणार बळकटी

बीड । प्रतिनिधी: ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीसाठी आणि शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. याचाच एक भाग म्हणून, ग्लोबल विकास ट्रस्ट () या नामांकित संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात रेशीम शेतीचा विकास आणि विस्तार करण्यासाठी एका महत्त्वपूर्ण समन्वय कराराची () तयारी सुरू झाली आहे. यासंदर्भातील सविस्तर आढावा बैठक नुकतीच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, ज्यामध्ये या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.




पोखरा २.० योजनेचे प्रभावी अभिसरण शासनाच्या महत्त्वकांक्षी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोखरा २.०) अंतर्गत रेशीम उद्योगाशी संबंधित विविध घटकांना जिल्ह्यात गती दिली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने शाश्वत उत्पन्नाचा स्रोत असलेल्या तुती लागवडीला प्रोत्साहन देणे, तुती पाला संवर्धनासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार शेडची बांधणी करणे आणि रेशीम कीटक संगोपन उद्योगाशी संबंधित इतर आधुनिक घटकांचा समावेश आहे. या सर्व बाबींमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीला पर्याय म्हणून एक खात्रीशीर आणि फायदेशीर जोडधंदा उपलब्ध होण्याचा मार्ग सुकर होणार आहे.शाश्वत रोजगाराची निर्मिती आणि शेतकरी सक्षमीकरणरेशीम शेती हा अल्पभूधारक आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अत्यंत कमी कालावधीत अधिक नफा मिळवून देणारा उद्योग मानला जातो.

ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा मिळणार आहे. या समन्वयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, दर्जेदार रोपांची उपलब्धता, कीटक संगोपन आणि उत्पादित कोशांच्या योग्य बाजारापेठेबाबतचे सहकार्य मिळणार आहे.प्रशासनाचे नियोजन आणि पुढील दिशाबैठकीत बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित यंत्रणांना या प्रकल्पाची ब्लू-प्रिंट तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. समन्वय कराराची () प्रक्रिया तातडीने पूर्ण करून, तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यामध्ये रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचा एक मजबूत गट तयार होईल आणि ग्रामीण भागातील आर्थिक स्थैर्य अधिक बळकट होईल, असा दृढविश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# शेळ्या-मेंढ्यांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न; शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात!

## किल्ले धारूर तालुक्यात पशुपालक मोठ्या संकटात; अन्यथा तीव्र आंदोलन उभारणार संतोष भैया गायके यांचा इशारा

किल्ले धारूर । प्रतिनिधी मनोज जगतापबीड जिल्ह्यातील किल्ले धारूर तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतीसह पशुपालन व्यवसायावरही मोठे संकट ओढवले आहे. पावसाअभावी हिरवा चारा उपलब्ध होत नसल्याने शेळ्या-मेंढ्यांचे पालन करणाऱ्या पशुपालकांसमोर जनावरांना जगवायचे कसे, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आगामी काळात तब्बल दहा महिने चाऱ्याची टंचाई जाणवण्याची भीती व्यक्त केली जात असून, शासनाने वेळीच ठोस उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने चारा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी आणि पशुपालकांना लवकरात लवकर आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी भाजपाचे सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते संतोष भैया गायके यांनी केली आहे.पावसाअभावी पशुपालन व्यवसाय संकटातकिल्ले धारूर तालुक्यातील अनेक शेतकरी शेतीसोबतच शेळी-मेंढीपालन हा जोडव्यवसाय करतात. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन पशुपालन आहे. मात्र, यंदा पावसाने ओढ दिल्याने गवत, हिरवा चारा आणि इतर वैरणीची उपलब्धता मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी, शेळ्या-मेंढ्यांना पुरेसा चारा मिळणे कठीण झाले आहे.शेतीतून उत्पन्न मिळण्याची आशा कमी झालेली असताना पशुधन सांभाळण्याचा खर्चही वाढत आहे.



बाजारातून चारा विकत घेणे अनेक अल्पभूधारक शेतकरी आणि पशुपालकांना परवडणारे नाही. अशा परिस्थितीत पशुधनाचे संगोपन करणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान बनले आहे. वेळेत चारा उपलब्ध झाला नाही, तर पशुधनाच्या आरोग्यावर आणि पशुपालकांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.पुढील दहा महिने कसे काढायचे?सध्याची परिस्थिती पाहता पशुपालकांसमोर आगामी काळातील चारा व्यवस्थापनाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. पावसाअभावी चाऱ्याचे उत्पादन घटले असून, उपलब्ध साठाही संपत चालला आहे. अशा वेळी शासनाने केवळ परिस्थितीचा आढावा घेण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष मदतकार्य सुरू करणे आवश्यक आहे.तालुक्यातील चारा टंचाईग्रस्त गावांचे तातडीने सर्वेक्षण करून चारा छावण्या सुरू करणे, पशुखाद्य उपलब्ध करून देणे, चारा डेपो सुरू करणे आणि पशुपालकांना आर्थिक मदत देणे यासारख्या उपाययोजनांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी संतोष भैया गायके यांनी केली आहे.शेतकऱ्यांनाही तातडीने मदत जाहीर करादुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरीही आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पिकांचे नुकसान, उत्पादनातील घट आणि वाढता शेतीखर्च यामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट आले आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करावी. तसेच पशुपालकांना दिलासा देण्यासाठी स्वतंत्र उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही गायके यांनी केली आहे.मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मोठे आंदोलनशेळ्या-मेंढ्या हे पशुपालकांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. चाऱ्याअभावी हे पशुधन संकटात सापडत असताना शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. किल्ले धारूर तालुक्यातील पशुपालकांच्या प्रश्नाकडे प्रशासन आणि शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. चारा टंचाईवर त्वरित उपाययोजना करून शेतकरी व पशुपालकांना दिलासा द्यावा; अन्यथा पशुपालकांच्या न्याय्य मागण्यांसाठी मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा भाजपाचे सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते संतोष भैया गायके यांनी दिला आहे.आता शासनाने पशुपालकांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा किल्ले धारूर तालुक्यातील शेतकरी आणि पशुपालकांकडून व्यक्त होत आहे.

# चिंचवन येथे रात्रीच्या अंधारात मौल्यवान सरकारी जमीन हडपणाऱ्या भू-माफियावर गुन्हा दाखल करा!

## महसूल व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर दबाव आणणाऱ्या अंगद बडे विरुद्ध भ्रष्टाचार निर्मूलन समिती आक्रमक; तीव्र आंदोलनाचा इशारा!

बीड / वडवणी (विशेष प्रतिनिधी):बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यांतर्गत येणाऱ्या मौजे चिंचवन येथे शासनाच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांच्या मौल्यवान जमिनीवर रात्रीच्या अंधारात बेकायदेशीर पक्के बांधकाम करून शासकीय मालमत्ता हडपल्याचा एक अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. चिंचवन येथील रहिवासी श्री. अंगद अंबादास बडे याने ग्रामपंचायत कार्यालयालगत असलेल्या अतिशय मोक्याच्या शासकीय गट / सर्वे क्रमांक ५२१ या जमिनीवर उघडपणे डाका टाकला आहे. या बेकायदेशीर कृत्याचा पर्दाफाश करत, संबंधित भू-माफियावर भारतीय न्याय संहिता () नुसार तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून शासकीय जमीन मुक्त करावी, अशी आक्रमक मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समिती (महाराष्ट्र राज्य) चे राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनिअर सादिक बाबामीया इनामदार यांनी राज्य प्रशासनाकडे केली आहे. *शासकीय कर्मचाऱ्यांवर खोट्या तक्रारींचा दबाव; भू-माफियाची दडपशाही!*प्राप्त माहितीनुसार, मौजे चिंचवन येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या लगत असणारा गट/सर्वे क्रमांक ५२१ हा पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा असून त्याचा कोणताही परवाना किंवा महसूल विभागाची मंजुरी घेतलेली नाही. असे असतानाही, केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अंगद बडे याने रात्रीच्या वेळेस बेकायदेशीर पक्के बांधकाम पूर्ण केले आणि त्या ठिकाणी त्रिमूर्ती मशनरी व हार्डवेअर नावाचे व्यावसायिक दुकान थाटले.याहून धक्कादायक बाब म्हणजे, ♦♦पान २ वर

# नांदगाव नाशिक घाटामध्ये ऊसतोड कामगारांचा टेम्पो पलटी झाल्याने बैल व कामगार जखमी



बीड (प्रतिनिधी):-नांदगाव नाशिक घाटामध्ये ऊसतोड कामगारांचा टेम्पो पलटी झाल्याने बैल व कामगार जखमी कामगार प्रकाश मगन भिल शेळावे ता पारोळा विलास वसंत भिल परविन एकनाथ भिल जंगीलाल हरीचंद जाधव गाव वावडदे तांडा ता जि जळगाव यांना तात्काळ दवाखान्यात ऍडमिट करून दत्तवाडी इंडिया शुगर साखरवाडी या कारखान्याचे शेती अधिकारी स्वानंद पाटील यांना फोन करून सदरील कामगार व यांच्या बैलांची झालेली नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अन्यथा तिथे येऊन कारखाना बंद करेल असे त्यांना सांगताच त्यांनी पाच दिवसाच्या आधी कामगारांना आम्ही मदत करतो तसे त्यांनी त्यांच्या कार्यकर्ता अमोल इप्पर त्याच्यासोबत चे कार्यकर्ते घेऊन तात्काळ मदतीला केली. हि मकत करण्यासाठी धडपड करणारे कृष्णा तिडके लोकनेते गोपीनाथराव मुंडेसाहेब ऊसतोड कामगार मुकादम व वाहतूकदार टीम नांदगावचे खूप खूप धन्यवाद

# ॲड. किशोर खेडकर यांच्यामुळे सायबर फ्रॉड गुन्ह्यातील फिर्यादीस तेरा लाख रु. मिळाले



बीड:- सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच पाच सायबर गुन्ह्याच्या प्रकरणात फिर्यादीस मा.०४ थे व ७ वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड दाखल प्रकरणात दी ०५/०६/२०२६ रोजी की.फो क्र : ४३३/२०२६ ,०४/०९/२०२६ की.फो क्र ७७४/२०२६ ,दी २१/०९/२०२६ की.फो क्र ८२६/२०२६ ,दी २२/०९/२०२६ , की.फो क्र ८३३/२०२६ व दी २८/०९/२०२६ की.फो क्र ८४३/२०२६ ॲड. किशोर खेडकर यांनी पाचही प्रकारातील फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून सर्व फिर्यादीस तेरा लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.फिर्यादीचे खाते देखील सुरळीत चालू करून देण्यात आले आहे. या सर्व संबंधित प्रकरणात दि ०७/१०/२०२६ रोजी सुनावणीत मा. ४ थे न्यायालयाने आदेश दिले.सदर प्रकरणात फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान ◆◆पान २ वर

# कथीत भ्रष्टाचाराच्या विरोधात अमरण उपोषण विद्यमान उपसरपंचासह ग्रामस्थांचा अमरण उपोषणाला पाठींबा

बीड (प्रतिनिधी):- मैंदा ता.जि.बीड येथील ग्रामपंचायत अंतर्गत कथीत भ्रष्टाचार व ग्रामसेवकांचे निलंबन करुन कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी वारंवार बीड जिल्हाधिकारी यांना व जि.प.मुख्यकार्यकारी अधिकारी यांना निदेवन देऊन कुठलीही कारवाई झाली नसल्याने अमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिध्दी पत्रकाद्वारे उपसरपंच उत्तरेश्वर घुमरे, रवि प्रकाश कसबे, पंकज सुभाष कसबे यांनी दिली आहे. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, १४ वा व १५ वित्त आयोग निधीचा सविस्तर हिशोब व चौकशी करावी.,

मैंदा येथील पाणीपुरवठा योजनेची सेखोल चौकशी करुन योजना नियमानुसार सुरु करावी., जल जीवन मिशन अंतर्गत निधी व झालेल्या कामांची चौकशी करावी. नरेगा/ मनरेगा अंतर्गत झालेल्या कामांची व निधीची चौकशी कारावी. दलित वस्तीतील निधीची सखोल चौकशी करा., ग्रामसभेतील ठरावांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी., ग्रामसेवकांचे निलंबन करुन दोषी आढल्यास कायदेशीर कारवाई करावी., भ्रष्टाचाराची रक्कम तात्काळ परत वसुल करावी., ग्रामसभा घेण्यास टाळाटाळ केल्याबाबत चौकशी व कारवाई करावी., मैंदा तांडा निधीची सखोल चौकशी करुन दोषीवर कडक कारवाई करण्यात यावी., मैंदा येथील मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी ग्रामरोजगार सेवकांना सेवेतुन बडतर्फ करुन परत कुठलाही ग्रामसभेचा ठराव न घेता त्यांच्याच मुलाला ग्रामरोजगार या पदावर रुजु केले. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करुन दोषींवर कडक कार्यवाही करावी या मागणीसाठी वारंवार निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने अमरण उपोषण करण्यात येत आहे. तसेच प्रशासनाने अमरण उपोषणाची दखल न घेतल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशाराही पत्रकाद्वारे, उपसरपंच उत्तरेश्वर घुमरे, रवि प्रकाश कसबे, पंकज सुभाष कसबे यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर हृदयरोग रुग्णांसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलचा आरोग्यसेवेसाठी पुढाकार

## बीडमध्ये ११ ऑक्टोबरला भव्य हृदयरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिर; पात्र रुग्णांना अँजिओप्लास्टी व बायपास सर्जरी मोफत

बीड (प्रतिनिधी) : मराठवाड्यातील दुष्काळी व प्रतिकूल परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात हृदयरोगाची तपासणी व उपचार उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने जैन सोशल फेडरेशन, अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड यांच्या वतीने विशेष हृदयरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत





जालना रोड, शाहू बँकेजवळील आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे होणार आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक अडचणी वाढल्या असून, अनेक कुटुंबांकडून आर्थिक कारणांमुळे आवश्यक आरोग्य तपासणी व उपचार पुढे ढकलले जातात. ही बाब लक्षात घेऊन केवळ आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही नागरिकाला आवश्यक हृदयरोग उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी हॉस्पिटलच्या वतीने आरोग्यसेवेला प्राधान्य देण्यात येत आहे.

या शिबिरासाठी बीडचे भूमिपुत्र, () हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अमित भराडिया यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. नागरिकांची हृदयरोग तपासणी करून त्यांच्या आरोग्याच्या स्थितीनुसार आवश्यक उपचार व पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

विशेष दरात हृदयरोग तपासणी

शिबिरामध्ये हृदयरोग तज्ज्ञांची तपासणी व सल्ला केवळ ₹२०० मध्ये उपलब्ध राहणार असून, सोबत मोफत करण्यात येणार आहे. तसेच २ फक्त ₹९०० आणि अँजिओग्राफी ₹३,००० या विशेष दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पात्र रुग्णांना अँजिओप्लास्टी व बायपास सर्जरी मोफत

हृदयरोगाचे निदान झाल्यानंतर आवश्यकतेनुसार पुढील उपचारांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. व अंतर्गत पात्र रुग्णांना योजनेच्या नियमानुसार अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी तसेच आवश्यक हृदयावरील उपचार व शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध होऊ शकतात.

# आचारसंहिता काळात पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याचे आदेश

## चौकशी करून कारवाईची राम खाडे यांची मागणी

बीड दि.६ (प्रतिनिधी): महाराष्ट्र विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत बीड जिल्हा परिषदेने प्राथमिक पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्याचा आदेश काढण्यात आल्याबाबत चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात म्हटले आहे की, महाराष्ट्र विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. शासकीय यंत्रणेकडून कोणतेही प्रशासकीय निर्णय, पदोन्नती अथवा आर्थिक परिणाम करणारे आदेश काढताना निवडणूक आचारसंहितेतील तरतुदींचे काटेकोर पालन करणे अपेक्षित आहे.बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांनी ८२ गणित-विज्ञान विषयाच्या शिक्षकांना प्राथमिक पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत आदेश दिनांक २५ सप्टेंबर २६ रोजी काढले आहेत. सदर आदेशासाठी उच्च न्यायालयाच्या याचिकेचा निर्णयाचा संदर्भ देण्यात आला आहे. जर सदर निर्णय सन २०२६ च्या सुरवातीला झालेला असेल, तर त्याची अंमलबजावणी त्याच वेळी किंवा त्यानंतरच्या योग्य प्रशासकीय प्रक्रियेद्वारे का करण्यात आली नाही? आणि आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीतच त्यावर आधारित आदेश काढण्याची आवश्यकता का निर्माण झाली? असा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने संबंधित निवडणूक प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली होती का? तसेच या आदेशामुळे किती आर्थिक लाभ होणार आहे, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात संबंधित कर्मचारी, अधिकारी तसेच आदेशास अंतिम मान्यता देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची भूमिका तपासण्यात यावी.

आचारसंहितेच्या कालावधीत जाणीवपूर्वक किंवा नियमांची योग्य पडताळणी न करता सदर आदेश काढण्यात आला आहे का? याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राम खाडे यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय शालेय आर्चरी स्पर्धेत ट्विंकलिंग स्टार स्कूलचा सुवर्णवेध!

## *अथर्व शेळकेची दमदार कामगिरी; विभागीय स्पर्धेसाठी निवड

बीड : प्रतिनिधीमहाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा आर्चरी असोसिएशन, बीड यांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित जिल्हास्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धा २०२६-२७ नुकतीच लॉ कॉलेज, बीड येथे उत्साहात पार पडली.



या स्पर्धेत ट्विंकलिंग स्टार इंग्लिश स्कूल, बीडच्या विद्यार्थ्याने आपल्या उत्कृष्ट क्रीडाकौशल्याची चमक दाखवत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.शाळेचा होतकरू खेळाडू अथर्व शेळके (१७ वर्षांखालील वयोगट) याने अचूक नेमबाजी, आत्मविश्वास, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.अथर्वच्या या शानदार कामगिरीमुळे त्याची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली असून, पुढील स्पर्धेसाठी त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. दिनेश ढाकणे आणि श्री. कृष्णा उगलमुगले यांचे मोलाचे मार्गदर्शन व अथक परिश्रम लाभले.अथर्वच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे चेअरमन श्री. गणेश मैड, प्राचार्य श्री. कृष्णनकुमार सी. एस. तसेच सर्व शिक्षकवृंदांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि आगामी विभागीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची घोडदौड अशीच सुरू आहे!

# रिपाइंची दुष्काळग्रस्तांना १०० ट्रक धान्याची मदत




मुंबई दि.६ (प्रतिनिधी) राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये यंदा दुष्काळ पडला असून शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी संकटात आहेत. त्यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (रिपाइं) वतीने १०० ट्रक धान्याचा मोफत पुरवठा करण्यात येणार आहे, अशी घोषणा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व रिपाइं अध्यक्ष रामादास आठवले यांनी केली. नवी मुंबईतील वाशी येथील विष्णुदास भावे नाट्य मंदिरामध्ये रिपाइंचा ६९ वा वर्धापन दिन रविवारी मोठ्या थाटात पार पडला.त्यावेळी झालेल्या पक्ष कार्यकर्ता मेळाव्यात मंत्री आठवले यांनी दुष्काळग्रस्तांना मदतीचे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर सीमा आठवले, जित आठवले, रिपाइं राज्य अध्यक्ष राजा सरवदे, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, युवक आघाडी प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पुबीड जिल्ह्यातील वृच्काकड़ा स्नांसाठी अन्न-धान्य ◆◆पान २ वर

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्पर्धेचे बक्षीस वितरण

## प्राथमिक गटात सई स्वप्नील कोकाटे, माध्यमिक गटात कार्तिक प्रकाश आतकरे प्रथम

गेवराई दि.६ (प्रतिनिधी) पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गेवराई नगरपरिषदेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेश उत्सव शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करून बसवणे स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत गेवराई शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला.ही स्पर्धा शालेय स्तरावर प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटांत घेण्यात आली. उत्कृष्ट गणेशमूर्ती तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन्ही गटांत समान स्वरूपाची बक्षिसे देण्यात आली. प्रथम क्रमांकासाठी ७ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३ हजार रुपये, तसेच सन्मानचिन्ह वप्रमाणपत्र देऊन



विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.या स्पर्धेत प्राथमिक गटात सई स्वप्नील कोकाटे यांनी प्रथम, अथर्व अमोल आरबड यांनी द्वितीय, सर्वेश सोमनाथ म्हेत्रे यांनी तृतीय, तर तन्वीदिनेश दीक्षित यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. माध्यमिक गटात कार्तिक प्रकाश आतकरे यांनी प्रथम, प्रिशा संतोष त्रिवेदी यांनी द्वितीय, वैष्णवी दत्तात्रेय लेंडगुळे यांनी तृतीय, तर श्रेया प्रदीपठोंबरे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर, पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पारंपरिक गणेशोत्सवाची परंपरा जपत पर्यावरणाचे ◆◆पान २ वर

# शिवाजीनगर पोलिसांची मटका जुगाराविरुद्ध धडक कारवाई; दोन कारवायांत ₹१,५४,०३०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

बीड (प्रतिनिधी)बीड शहरातील अवैध जुगार व मटका व्यवसायाला आळा घालण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांना अवैध जुगार अड्ड्यांवर धाडी टाकून प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजीव नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. शितल कुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व अंमलदारांनी दिनांक ०६/१०/२०२६ रोजी धानोरा रोड, टी-पॉईंट, बीड येथे मटका जुगाराविरुद्ध दोन स्वतंत्र कारवाया केल्या.पहिल्या कारवाईमध्ये आरोपी रफीक बेग चाँद बेग याच्याकडून ₹२,१३०/- रोख रक्कम, एक चिठ्ठी बुक, कार्बनचा तुकडा व काळ्या रंगाचा बॉलपेन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई सायंकाळी सुमारे १७:४५ वाजता करण्यात आली.त्यानंतर करण्यात आलेल्या दुसऱ्या कारवाईमध्ये आरोपी सुलतान खान सदाद पठाण याच्याकडून ₹१,९००/- रोख रक्कम, चिठ्ठी बुक, कार्बनचा तुकडा व काळ्या रंगाचा बॉलपेन तसेच ₹१,५०,०००/- किमतीची होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. २३ ९५८२) असा एकूण ₹१,५१,९००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई सायंकाळी सुमारे १९:१५ वाजता करण्यात आली.



दोन्ही कारवायांमध्ये संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ ( अ ) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजीव नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक श्री. शितल कुमार बल्लाळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. माधव काटकर, पोलीस उपनिरीक्षक श्री. ज्ञानेश्वर धोत्रे, पोहेकॉ/१६६४ रवींद्र गोवर्धन आघाव, पोशि/४१० सुरज राजेंद्र वाघमारे, पोशि/१३८५ राजाभाऊ जाधव यांनी केली.शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत अवैध जुगार, मटका व इतर बेकायदेशीर व्यवसायांविरुद्ध यापुढेही सातत्याने कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

# बीडच्या पाणी पुरवठ्या संदर्भात भाजपा आक्रमक मुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन

बीड दि.६ (प्रतिनिधी) शासनाने बीड तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून, या पार्श्वभूमीवर शहरात निर्माण झालेली पाणी टंचाई आणि विविध नागरी समस्या तातडीने सोडविण्याच्या मागणीसाठी भाजप नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालीलशिष्टमंडळाने मंगळवारी (दि.६) नगरपरिषद प्रशासनाला निवेदन दिले. या गंभीर समस्यांवर कालमर्यादेत ठोस निर्णय घेऊन उपाययोजना न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपच्या वतीने देण्यात आला.भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नगरसेवक आणि



उमेदवारांनी आपापल्या प्रभागातील विविध समस्यांचे निवेदन प्रशासनाकडे सादर केले. शहरातील पाणीटंचाई लक्षात घेता नळजोडणी नसलेल्या तसेच टंचाईग्रस्त भागांत अधिकृत टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करावा, नवीन पाईपलाईनसाठी डीपीसीकडून तातडीने निधी मंजूर करून घ्यावा. टँकर वितरणातील गैरव्यवहार रोखण्यासाठी सर्व टँकर्सवर जीपीएस आणि क्यूआर कोड प्रणाली अनिवार्य करावी. तसेच शाहूनगर, बार्शी रोड आणि धानोरा रोड येथील पाणी भरणा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून कडक देखरेख ठेवावी. अमृत अटल पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित क्रॉसिंगची कामे पूर्ण करावीत. पालिकेचा वीज खर्च कमी करण्यासाठी महाऊर्जाच्या सहकार्याने समनापूर रोडवरील जागेवर चार कोटी रुपयांचा सौरऊर्जा प्रकल्प तातडीने राबवावा. शहरातील बंद बोअरवेल, हातपंप आणि मोटारपंप तातडीने दुरुस्त करून पाणी उपलब्ध करून द्यावे. आगामी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बंद पथदिवे दुरुस्त करावेत तसेच मंजूर सोलर मिनी हायमास्ट तातडीने बसवावेत. स्वच्छता विभागाने सर्व प्रभागांत वेळेवर घंटागाड्या पाठवून नाल्यांमधून उपसलेला कचरा तत्काळ उचलावा. पाण्याची भीषण टंचाई संपेपर्यंत सिमेंट रस्ते आणि नाल्यांच्या बांधकामांना तात्पुरती स्थगिती द्यावी. टंचाईच्या काळात दैनंदिन कामकाजावर देखरेख

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय रघुनाथ हांगे यांनी ओम ऑफसेट, क्रांतीनगर, तहसीलच्या मागे, डी.पी.रोड बीड, ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक साप्ताहिक अक्षर वार्ता कार्यालय, क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या मागे, डी.पी.रोड, बीड ता.जि.बीड पिन –४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले आहे. संपादक : संजय रघुनाथ हांगे,मो.९७६६२६८४१५ Email : aksharwartanews@gmail.com

The Newspaper Printed, Published and Owend by SANJAY RAGHUNATH HANGE and Printed at OM OFFSET, Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) and published at office Of DALY SAPTAHIK AKSHAR VARTA , Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) Editor : SANJAY RAGHUNATH HANGE Mo : 9766268415